|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

## बहि:स्थ शिक्षण आणि अध्ययन विभाग

## Department of External Education & Learning (DEEL)

KBCNMU/DEEL/२२/अंतर्गत / १४ /२०२० दि. ०५/०२/२०२०

**डील विभागा मध्ये प्रवेशित पदवी व पदव्युत्तर शिक्षणक्रमांच्या परीक्षार्थी व पुनर्परीक्षार्थी (Repeater) विद्यार्थ्यांसाठी सुचना**

- डील विभागाद्वारे पदवी व पदव्युत्तर शिक्षणक्रमांतर्गत ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्यापासुन परीक्षा दिलेली नाही किंवा जे पुनर्परीक्षार्थी आहेत त्यांना सुचित करण्यात येते की, मे २०२० मध्ये होणाऱ्या अंतीम लेखी परीक्षेचे आयोजन मे महिन्याच्या प्रथम किंवा द्वितीय आठवड्यापासुन करण्यात येत आहे. त्यासाठी दि. १० फेब्रूवारी २०२० पासुन ०४ एप्रिल २०२० पर्यंत विद्यार्थ्यांसाठी परीक्षा अर्ज उपलब्ध करुन दिले आहेत.

- परीक्षा अर्ज www.nmu.ac.in या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.वरील संकेत स्थळावर गेल्यानंतर डाव्या बाजुस असलेल्या DEEL(External Mode) या लिंकवर क्लिक करावे त्यानंतर येणाऱ्या पेजवरील डाव्या बाजुस असलेल्या **DEEL Exam Forms** २०२० या लिंकवर क्लिक करावे.

- सदर लिंकवर क्लिक केल्यावर पीडीएफ फाईल ओपन होईल त्यानंतर (Ctrl +F) ही कमांड वापरुन आपल्या नावाचा परीक्षा अर्ज शोधुन त्याचीच प्रिंट काढावी.

- कोणत्याही सबबीवर परीक्षा अर्ज भरल्याशिवाय परीक्षेस बसता येणार नाही.

- पदवी व पदव्युत्तर शिक्षणक्रमांतर्गत २०१९-२० मध्ये **प्रथम, द्वितीय किंवा तृतीय** वर्षास प्रवेश घेतलेल्या Fresher (ज्या विद्यार्थ्यांचे द्वितीय व तृतीय वर्षाचे सर्व विषय पास असतील) अशा विद्यार्थ्यांनी प्रिंट केलेला परीक्षा अर्जच पाठवायचा आहे. **फी चलन भरावयाचे नाही.**

- **ज्या विद्यार्थ्यांचे प्रथम, द्वितीय किंवा तृतीय वर्षाचे काही विषय बाकी असतील (Repeater) अशा विद्यार्थ्यांनी (प्रथम व द्वितीय वर्षातील प्रत्येक वर्षासाठी वेगवेगळे फी चलन भरावे लागेल. उदा. एम. ए. इतिहास प्रथम वर्षाचा एक पेपर व द्वितीय वर्षाचे दोन पेपर बाकी असतील तर प्रथम वर्षाचे एक चलन व द्वितीय वर्षाचे एक चलन असे दोन (२) चलन वेगवेगळे भरावे लागतील. स्वतंत्र वेगवेगळे चलन काढून ते सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या जळगाव, धुळे, नंदूरबार या जिल्ह्यातील नजीकच्या शाखेत भरावयाचे आहेत.**

- सदर अर्ज भरण्याची अंतीम मुदत **दि. ०४ एप्रिल २०२० ही असून** पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांनी भरलेला परीक्षा अर्ज व त्यासोबत बँकेत भरलेल्या चलनाची Finance/DEEL या नावाच्या चलनाची प्रत व मागील वर्षाच्या गुणपत्रकाची झेरॉक्स व एक पासपोर्ट फोटो इ. दस्तऐवज जोडुन खालील पत्त्यावर स्पिड/रजिस्टर पोस्टाद्वारे सदर तारखेच्या आत पाठवावेत.

- सदर अंतीम लेखी परीक्षेचे आयोजन जळगाव, धुळे व नंदूरबार या तिनही जिल्ह्यात होणार आहे याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी त्यानुसारच प्रिंट केलेल्या परीक्षा अर्जावर जिल्ह्याच्या नावाचा उल्लेख हस्तलिखीत करावयाचा आहे.परीक्षाकेंद्रांची नावे हॉलतिकीटवर येतील .

- ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्जावर परीक्षा केंद्राचे नाव टाकले नाही त्या विद्यार्थ्यांना विद्यापीठ जे परीक्षा केंद्र देईल त्याच केंद्रावर विद्यार्थ्यांना परीक्षा द्यावी लागेल याची नोंद घ्यावी.

- परीक्षा अर्जावरील आपले नाव, आईचे नाव, विषय तपासुन बरोबर असल्याची खात्री करावी. काही बदल असेल तर डील विभागाच्या ०२५७-२२५७४९५/०२५७-२२५८४९६ या दूरध्वनी क्रमांकावर लगेच संपर्क साधावा.

- परीक्षेचे वेळापत्रक एप्रिल २०२० च्या प्रथम आठवडयात डीलच्या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल व त्यानुसार परीक्षेच्या किमान ८ ते १० दिवस अगोदर हॉल टिकीट संकेत स्थळावरच उपलब्ध करुन देण्यात येईल.

## ❖ महत्वाच्या सुचना-

- जुलै- ऑगस्ट २०१५ मध्ये डीलच्या वेबसाईटवरील नोटीस बोर्डवर सुचना टाकलेली होती की, ज्या विद्यार्थ्यांना डील विभागाद्धारे गुणपत्रक मिळाले आहे त्यावर डिस्टन्स मोड असा उल्लेख आहे परंतु दि. १६, एप्रिल २०१५ रोजी झालेल्या विद्या परिषद ठराव क्र. वि.प.ए-४८/२०१५ नुसार Distance Education ऐवजी External Mode असलेले सुधारीत गुणपत्रक छपाई करण्यात आलेली आहेत. सदर निर्णयानुसार विद्यार्थ्यांनी जर गुणपत्रक बदलवुन नेलेली नसतील त्यांनी परीक्षे अगोदर सदरची जुनी गुणपत्रके डील विभागात जमा करुन त्याऐवजी नवीन बदललेली गुणपत्रके घेऊन जावीत.

- परीक्षा अर्ज सादर करण्याची अंतीम तारीख दिलेली आहे त्यानंतर आलेले परीक्षा अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी व त्यास संबंधित विद्यार्थीच जबाबदार राहील.

- वेळोवेळी संकेत स्थळावर माहिती प्रसिद्ध केलेली असते त्यामुळे विद्यार्थ्यांनी वारंवार संकेत स्थळास भेट द्यावी व जर काही बदल झाले असतील तर ते समजुन घेणे ही विद्यार्थ्यांची जबाबदारी राहील याची नोंद घ्यावी.


वेबसाईट : www.kbcnmu.ac.in
☎: ०२५७-२२५७४९५, २२५८४९६
ई-मेल : ideal@nmu.ac.in
फॅक्स: (९१) ०२५७-२२५८४०३, ४०६

**परीक्षा अर्ज पाठविण्याचा पत्ता**

**मा. संचालक,**
**बहि:स्थ शिक्षण आणि अध्ययन विभाग**
**Department of External Education & Learning (DEEL),**
**डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम विद्यार्थी भवन, रिक्षा स्टॉप जवळ,**
**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव, पिनकोड -४२५००१**

**संपर्कासाठी : दूरध्वनी क्र. ०२५७-२२५७४९५/२२५८४९६**

**संकेत स्थळ (Website)** :- www.nmu.ac.in/www.nmu.ac.in संकेत स्थळावर गेल्यानंतर डाव्या बाजुस असलेल्या DEEL(External Mode) लिंक

**सदर अंतीम लेखी परीक्षेसाठी डील विभागाद्वारे शुभेच्छा !**

प्रा. अं . बा . चौधरी
संचालक,
बहि:स्थ शिक्षण आणि
अध्ययन विभाग (DEEL)


वेबसाईट : www.kbcnmu.ac.in
☎: ०२५७-२२५७४९५, २२५८४९६
ई-मेल : ideal@nmu.ac.in
फॅक्स: (९१) ०२५७-२२५८४०३, ४०६